**निशाणी क्र. ३८**

**अर्जदारा तर्फे साक्षीदार क्र. २**

माझे नाव :— **दिपक कुमार सिंग**,

माझे वय :— ४४ वर्षे

व्यवसाय :— सनफलॅग कंपनी सुपरवाझर,

राहणार :— वरठी, भंडारा, जि. भंडारा.

**अर्जदारा तर्फे सर तपास श्री. पी. एच. आठवले यांचे तर्फे**

१. मी मोतीलाल हरकंडे यांना ओळखतो. ते आमच्या कंपनीत कार्यरत होते. ते ग्रॅन्डीग मशीनवर हेल्पर म्हणुन कार्यरत होते. त्यांना मासीक वेतन १२,०००/— आणि ओव्हर टाईम केल्यास १५,०००/— रूपयांपर्यंत मिळत होते. वेतनाची त्यांना संगणीकीकृत वेतनपत्र देण्यात येत होते. आता मला त्यांचे वेतनप्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते पोर्णिमा इंटरप्रायझेस यांनी जारी केलेले आहे. पोर्णिमा एंटरप्रायझेस हे सनफलॅग कंपनीमध्ये कर्मचारी पुरवीण्याचे काम करीत होते. आता मला वेतनप्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते वेतनप्रमाणपत्र मोतीलाल हरकंडे यांचे आहे. वेतनपत्रास **निशाणी क्र. ३९** देण्यात येते.

**गैरअर्जदार क्र. १ तर्फे उलट तपास श्री. हितेश वर्मा यांचे तर्फे**

२. हे खरे नाही की मी सनफलॅग कंपनीमध्ये सुपरवासझर म्हणुन होतो. मी पोर्णिमा एंटरप्रायझेस हे कर्मचारी पुरविण्याचे काम करीत होते ते दाखविण्यासाठी कोणतेही दस्ताऐवज सादर केलेले नाही. मी पोर्णिमा एंटरप्रायझेस मध्ये सुपरवायझर म्हणुन कार्यरत असल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज दाखल केलेले नाही. मी मोतीलाल हरकंडे हे

पोर्णिमा एंटरप्रायझेस मध्ये कार्यरत असल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज दाखल केलेले नाही. आता मला निशाणी क्र. ३९ दाखविण्यात आले. हे खरे आहे की, निशाणी क्र. ३९ वर पोर्णिमा एंटरप्रायझेस यांचे कुठेही सही व शिक्का नाही. मोतीलाल हरकंडे यांना त्यांना मिळणा—या वेतनाबाबत मी पोर्णिमा एंटरप्रायझेस मधुन वेतन पत्राव्यतिरिक्त कोणतेही दस्ताऐवज दाखल केलेले नाही. हे खरे आहे की, मोतीलाल हरकंडे यांचे हजेरीपट, वेतनपट व इतर कोणतेही दस्ताऐवज मी दाखल केलेले नाही. हे खरे आहे की, मी अर्जदाराच्या सांगण्यावरून कोर्टात साक्ष देत आहे.

**<u>गैरअर्जदार क्र. २ व ३ तर्फे वकिल गैरहजर</u>**

३. उलट तपास काही नाही.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

Digitally signed by ATUL KESHAOLAL SHAH
Date: 2025.08.02 16:10:18 +0530

(अतुल के. शाह)
सदस्य
मोटार अपघात प्राधिकरण,
भंडारा.

दिनांकः ०२/०८/२०२५.